# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री.अर्जुन मच्छिंद्र यादव<br>मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.अर्जुन मच्छिंद्र यादव, मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली यांनी शेतीपंप विद्युत पुरवठा मिळावा यासाठी वि.प.कडे दिनांक ३०.११.२००९ ला अर्ज केला व त्यासाठी भरावी लागणारी फी रु.५०/–पोष्टाच्या मनीऑर्डरने पाठविली. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १.१२.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. १०८४२ दि. ४.१२.२००९ नुसार कृती मानके साध्य करण्यात वितरण कंपनीला अपयश आल्यास तक्रारदारास भरपाई देणेबाबत निर्देश केले आहेत.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वितरण वाहिनीचा विस्तार असलेने अर्जदाराचा अर्ज प्राप्त झालेपासून १ महिन्याचे आंत वि.प.ने चलन देणे गरजेचे होते, परंतु तसे झाले नाही. त्यामुळे विलंबापोटी भरपाई मिळावी यासाठी मंचाकडे दि. ११.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. ३१.३.२०१० चा लेखी अहवालात तक्रारदाराचा शेतीपंप कनेक्शनसाठी अर्ज दि. १.१२.२००९ रोजी मिळाल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. २९.१२.२००९ रोजी चलन देण्यात आले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ७.४.२०१० रोजी सुनावणीस ठेवण्यात आली, कारण दि. ३.३.२०१० ला वि.प.ने नोटीस देवूनही लेखी अहवाल दिला नाही. सुनावणी दि. २३.३.२०१० ला ठेवली असता, वि.प.तर्फे वीज बिलांच्या वसुलीसाठी विशेष वसुली मोहीम राबविण्यात आल्यामुळे मुदतवाढ मागून घेतली व दिनांक ७.४.२०१० ला म्हणणे दाखल केले. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग हजर. श्री. मैंलापुरे यांनी चलन मुदतीत दिले आहे असे सांगितले. त्याबाबत तक्रारदाराची तक्रार नसल्याची लेखी म्हणणे सादर करण्यास मुदतवाढ द्यावी असे प्रतिपादन केले. त्यानुसार तक्रारदाराचे चलन मिळाल्याचे मंचाला अग्रेषित केलेले लेखी पत्र दि. २०.४.२०१० ला या कार्यालयात प्राप्त झाले. ग्राहक प्रतिनिधींनी चलन दिल्याबाबतचा पुरावा हजर करावा अशी मागणी केली. तक्रारदाराने अर्ज कोणत्या दिवशी दिला आहे हे स्पष्ट होत नाही. तथापि तक्रारदाराने त्याचे गट क्र. १०८ मधील ३ एचपीचे शेतीपंप कनेक्शनसाठी दि. २९.१२.२००९ ला वि.प.कडून चलन मिळाल्याचे मान्य केले आहे. तक्रार प्रतिनिधी मार्फत आल्यामुळे तक्रारदाराने प्रतिनिधींची मान्यता किंवा त्यांना याची माहिती देणे जरुरीचे होते. असे असले तरी, ग्राहकाने शेतीपंप कनेक्शनसाठी दि. ३०.११.२००९ ला किंवा १.१२.२००९ ला अर्ज दिला असला तरी १ महिन्याचे आंत त्यांस चलन देणे जरुरी होते. त्याप्रमाणे वि.प. ने दि. २९.१२.२००९ ला तक्रारदारास चलन दिले आहे, या बाबत पुरावा हजर करणे जरुरी आहे. श्री. मैंलापुरे यांनी २०.४.२०१० च्या पत्रासोबत तक्रारदाराचे दि. २९.१२.२००९ ला मुदतीत चलन मिळाल्याचे व कोणतीही तक्रार/हरकत नसल्याचे पत्र मंचामध्ये सादर केले आहे. तक्रारदारास नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क प्राप्त होत नाही त्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल.

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ३.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :